# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ०६-२३** **दिनांक ०६/०१/२०२३**

## इलेक्ट्रिकसिटी बिलाबाबत फसवणूक झालेली रक्कम रुपये २५,०००/- परत मिळविण्यात नालासोपारा पोलीस स्टेशनला यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील ॲपल २ कॉम्प्लेक्स यशवंत गौरव, नालासोपारा (पश्चिम) येथे राहणारे सौ. प्रियांका बिल्कु चक्रवर्ती यांना दिनांक १६/१२/२०२२ रोजी १३.०० वाजताच्या सुमारास त्यांचे मोबाईलवर एक अनोळखी इसम **एम.एस.ई.बी. मधुन बोलत असल्याचे भासवून तुमचे राहते रुमचे विजेचे बिल भरणे बाकी आहे ते न भरल्यास विज पुरवठा खंडीत होईल.** तेव्हा सदर विजपुरवठा अखंडीत चालू ठेवण्याकरीता तात्काळ ऑनलाईन बिल भरा असे सांगुन त्यांनी तक्रारदार यांना एक लिंक पाठविली. सदरची लिंक तक्रारदार यांनी ओपन केली असता त्यावर **AnyDesk** हया ॲप्लिकेशनद्वारे अनोळखी इसम याने तक्रारदार यांचे बँक खाते मधुन परस्पर तीन ट्रँन्झॅक्शन करुन **एकुण रक्कम रुपये ८५,०००/-** डेबिट केले असल्याचा मेसेज तक्रारदार यांना प्राप्त झाल्याने तक्रारदार यांना त्यांची फसवणूक झाल्याचे समजले. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी तात्काळ नालासोपारा पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केला होता.

नमूद तक्रारी बाबत पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणूक झालेली रक्कम ऐरॅान पे, वनमोबिक्विक व पेयु पेमेंट या ऑनलाईन पेमेंट गेटवे वर गेल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाले. त्याबाबत लागलीच संबंधीत नोडल अधिकारी यांचेशी संपर्क करुन सदरचे पैसे तात्काळ डेबिट फ्रिज करणेबाबत ई मेल द्वारे पत्रव्यवहार करण्यात आला होता. पत्रव्यवहारानुसार **पेयु पेमेंट** नोडल अधिकारी यांनी तक्रारदार यांची फसवणुक झालेले रक्कमेबाबत पडताळणी करुन पेयु पेमेंट गेटवेवर असलेली रक्कम **रुपये २५,०००/- रुपये** थांबवुन तात्काळ सदरबाबत रिप्लाय केला. अशाप्रकारे तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम रु. २५,०००/- ही त्यांचे खात्यावर वळविण्यात आली.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एस.एम.एस. प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एस.एम.एस, ईमेल, कॉल्स यांची विश्वासहर्ताची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा **O.T.P.** किंवा आपली वैयक्तिक माहिती देवू नये.
- तसेच फसवणुक झाल्याचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा जेणेकरुन **Golden Hour Period** मध्ये फसवणुक झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता मदत होईल.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, तसेच सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक योगेश मोरे यांनी पार पाडली आहे.

--------------ooooo--------------